SJIF 2015 : 3.801
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# समावेशक शिक्षण

**Mrs Neelima Narayan Tikhe, Ph. D.**

*Principal, Subhashanna Kul College of Education, Patas Pune*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

शालेय शिक्षणाच्या प्रवाहातील धोरणांना लक्षात घेऊन राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने समावेशक शिक्षण हा विषय अभ्यासक्रमात अंतर्भूत केला.६ते१४ वयोगटातील सर्व मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे ही शासन व समाजाची जबाबदारी आहे.त्या अनुषंगाने सर्व मुलामुलींना शिक्षण मिळते आहे.विशेष विद्याथ्यांना सर्वसामान्य मुलांच्या बरोबरीने जवळच्या शाळेत प्रवेश दिला जात आहे.१९९४मध्ये स्पेन मधील सलमानका या ठिकाणी एका आंतराष्ट्रीय परिषदेमध्ये समावेशक शिक्षणाला अंतिम स्वरूप देण्यात आले.प्रत्येक बालकातील क्षमता विकसित आणि समृध्द होईपर्यंत त्याला शिकू द्यावे.सर्वसामान्य मुलांच्या बरोबर याही मुलांचे शिक्षण म्हणजे शिक्षणप्रवाहात सर्व बालकांचा समावेश असा त्याचा अर्थ आहे. पडणार

समावेशक शिक्षणात अपंग मुले इतर मुलांपासून वेगळी नाहीत. शाळेतील इतर मुलांबरोबर त्यांना सर्व कार्यामध्ये सहभागी करून घेतले जाते. सर्वांना समानसंधी दिली जाते .वर्गशिक्षकांना विशेष प्रशिक्षण
दिलेले असते.त्यामुळे शिक्षक या मुलांच्या गरजा, क्षमता ओळखून त्याला अनुसरून शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करतात,शाळेतील किवां समवयस्क ,यांना योग्य मार्गदर्शन केले जाते.त्यामुळे वर्गातील इतर मुले अपंगाच्या अडचणी जाणून घेतात.त्यांच्याशी प्रेमाने,मित्रत्वाच्या नात्याने वागतात त्यांना टोचून बोलत नाहीत./कुश्चीतपणाने हसत नाहीत.त्यामुळे आपल्यात व्यंग

आहे,आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत ही न्यूनगंडाची भावनां अपंगाच्या मनातून नाहीशी होण्यास मदत होते.समावेशक शिक्षणात अपंगाचे शिक्षण हा सर्वसामान्य शिक्षणाचा एक भाग आहे.अपंगाला त्यांच्या आवडीच्या,सोईच्या शाळेत जाण्याची सुविधा मिळते.यांना शैक्षणिक व रोजगार ग्राहक म्हणून विशेष सर्जनशील ,समुदायक, घरगुती स्वरूपाच्या प्रत्येक सामाजिक कार्यात सहभागाची समान संधी मिळते.सर्वसामान्य शाळेत हि मुले जाऊ लागली की सर्वसामान्य शाळेतील शिक्षकांना शास्त्र,भाषा व गणित या विषयाचा अभ्यासक्रम म्हणजे काय हे शिकवायचे माहिती असते.परंतु विशेष विद्यार्थीसाठी शिक्षकांना वेगळे प्रशिक्षण दिले जाते.

<u>समावेशक शिक्षण संदर्भात व्याख्या खालील प्रमाणे</u> .

- 'बूथ 'च्या मते - प्रक्रिया समावेशक शिक्षण हि अशी आहे ज्यात शिक्षणापासून वंचितता कमी करण्यासाठी अध्ययनातील संस्कृती आणि समुदाय यांचा सहभाग वाढवून सर्व अध्यायनार्थीच्या विभिन्न गरजा जाणणे व त्यावर कृती करणे होय.
- uneslo (२००३)अंतर आणि अडथळ्यामुळे जी असुरक्षित आहे अशी बालके ,युवक व प्रौढ यांच्या अध्ययन गरजा शोधून जाणून घेणे असा हा विकासात्मक उपागम म्हणजे समावेशकता होय.
- **Dakar world Education Forum(2000)**

Inclusive Education means that school should accommodate all children regardless of their physical,intellectual,social,Emotional linguistic or Other Conditions. This Shold Include Disabled and gifted Children,street and working children,children from remote or nomadic populations, children from linguistic ,ethnic or culturrally minorities and children from other disadvantages or marginalized areas or groups.

शाळेत सर्वच बालकांचे त्यांच्या शारीरिक बौद्धिक ,सामाजिक,भावनिक,भाषिक,/अन्य स्थिती लक्षात न घेता समावेशक करणे म्हणजे समावेशक शिक्षण . त्यात अक्षमता असलेली बालके , आणि प्रतिभाशाली बालके ,रस्यावरील आणि बालकामगार बालके , दूरवरच्या प्रदेशातील आणि भटके लोक ,भाषिक,वांशिक / संस्कृतिक अल्पसंख्याक

आणि अन्य वंचित बालके /दूर अंतरावरील प्रदेश व गटातील बालके अशा सर्वांचा समावेश समावेशक शिक्षणात होतो.

- Loremand and Deppler (2001)-Inclusion means full inclusion of children with diverse abilities in all aspects of schooling that other children are able to access and enjoy. It involves regular schools and classrooms genuinely adopting and changing to meet the need of all children ,as well as celebrating and valuing differences.
- समावेशक शिक्षण म्हणजे शाळेच्या सर्व बाजूमध्ये विभिन्न क्षमता असलेल्या बालकाच्या पूर्णपणे समावेश ज्यात अन्य बालकांना पायाभूत सुविधा व आनंद मिळेल.ज्यामध्ये सर्वच बालकांच्या गरजांना शाळेत व वर्गामध्ये सामावून घेणे .

According to barton (1997)-Inclusive educeation is not merely about providind access into mainstream school for pupils who have previously been excluded it is not about closing down an unacceptable system of segregated provision and dumping those pupils in on unchanged mainstream system existing school systems in terms of physical factors curriculum aspects,teaching expectations styles leadership roles will hare change .this is because inclusive education is about the participation of all children and young people and the removal of all forms of exclusionary practice.

भारतात युनिसेफच्या सहकार्याने एन.सी.ई आर.टी.ने १९८७मध्ये एक प्रकल्प केला जो नियमित शाळेत १९९७मध्ये प्रत्यक्षात शिक्षणाच्या रूपाने विद्यार्थ्यांच्या एकात्मीकरणात कार्यास्वरुपात आला.सर्व शिक्षा अभियानात MHRT ने नमूद केले आहे ते असे.

SSA will ensure that every child with special needs, irradiative of king,
Category and degree of disability is provided education in an appropriate environmental SSA will adopted 2040 rejection policy so that no child is left of the education system.It will also support a wide range of approaches, options and strategies for education of children with special needs.

Inclusive education means welcome all children without discrimination into regular or ordinary school.It refers to the process of all children in their neighbourhood school,regardless of the nature of their disabilities,students participating in a inclusion programmefollw the same schedule as their classmates and participating age appropriate academic classes.

समावेशक शिक्षण म्हणजे समाजातील सर्व मुलांसाठी जाणीवपूर्वक शाळेची रचना,ज्या शाळेत सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय होऊ शकेल.विशेष गरजा

असलेल्या मुलांची शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांना सामान्य मुलांबरोबर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे होय.

समावेशक शिक्षणाची उद्दिष्टे

१)समावेशक शिक्षणच अर्थ समजून घेणे.

२)समावेशक शिक्षणातील गरजा जाणून घेणे .

३)समावेशक शिक्षणामध्ये शाळेचे स्वरूप पाहणे.

४)दुर्बल,अपंग आणि वंचित यातील फरक जाणून घेणे.

५)समावेशक शिक्षणासाठी भौतिक साधन सुविधाची पूर्तता करणे.

६)सद्यस्थितीतीलबदल जाणून घेणे.

७)सर्व समावेशक शिक्षणाची कार्यवाही समजून घेणे.

६ते१४ वयोगटातील सर्व मुलामुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे आणि शिक्षणासाठी आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देणे. हा उद्देश सर्व समावेशक शिक्षणाचा आहे.प्रत्येक मुलाचा आत्मविश्वास वाढेल,त्याच्यामध्ये विविध क्षमतांचा विकास होईल व आनंदी जीवन प्रत्येक मुलाला जगता येईल .आत्मनिर्भरपने जगण्याचा आणि समाजाचा एक घटक बनण्याचा नैसर्गिक हक्क आहे.

❖ समावेशक शिक्षणाची वैशिष्टये

१)सर्व प्रकारच्या मुलांना प्रवेश दिला जातो.

२)मुलांच्या गरजेनुसार वर्ग बदलले जातात.

३)मुलांच्या गरजांना विशेष महत्व दिले जाते.

४)शिक्षणाबरोबरच सामाजिक कार्याची माहिती दिली जाते.

५)एकमेकांना सहकार्यात्मकतेची ,मदत करण्याची वृत्ती निर्माण केली जाते.

६)आपापसातील परस्पर संबंध चांगले निर्माण केले जातात.

७)मुलांच्या क्षमतेनुसार शिक्षणाची उद्दीष्ट्ये ठरवली जातात.

८)पालकांची भूमिका मैत्रीपूर्ण असते.

९)कौशल्य विकसनासाठी शाळा हवी ती मदत करते.

१०)मुलांच्या प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.

११)समस्या सोडविण्यात सर्व शिक्षकांचा सहभाग असतो.

१२)अध्ययन व अध्यापनासंदर्भात सर्व सुविधा शाळेकडे असतात.

१३)विशिष्ट गरजू मुलांचा विचार केला जातो.

१४) गरजू मुले शिक्षणापासून वंचित राहत नाहीत.

१५)सर्व उपक्रमात सर्वच विद्यार्थांचा सहभाग घेताला जातो.

१६)अध्यापनात सर्व विद्याध्यींचा सहभाग घेतला जातो.

❖ समावेशक शिक्षणाचे घटक -

समावेशक शिक्षण पध्दतीमध्ये विविध घटकाचे सहकार्य लाभते.त्यांच्या सहकार्यामुळेच सर्वसामान्य मुलाबरोबर अपंगाना शिक्षण दिले जाते.१९९४मध्ये सलमानका येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत विशेष मुलांच्या शिक्षणाची नवी पद्धती मान्य करण्यात आली..त्याच बरोबर प्रत्येक बालकास शाळेत बरोबरच्या मित्रासोबत शिक्षण घेता येऊ लागले.

समावेशक शिक्षणाचे घटक

लोकप्रतिनिधी

विद्यार्थी सहकारी .

सर्वसामान्य शाळेतील शिक्षक.

विशेष शिक्षक.

सर्वसामान्य शाळेतील भौतिक साधन सुविधा .

समाज.

पालक .

समाजातील गरजेनुसार मनुष्यबळ व संशोधन साहित्य.

शासकीय कर्मचारी (समावेशित शिक्षणासंदर्भात ).

-

❖ समावेशक शिक्षणात प्रसारमाध्यमांची भूमिका

| श्राव्यमाध्यम | द्रृकमाध्यम | द्रृकश्राव्यमाध्यम |
|---|---|---|
| रेडीओ, | संगणक, | दूरदर्शन,लोककला, |
| टेपरेकॉर्डर. | नियतकालिके, | विविध सभा ,पथनाट्य |
| | प्रदर्शन, | उदबोधन माहिती , |
| | वृत्तपत्र . | विविध संस्था |

वरील सर्व माध्यमान्द्वारे शिबिरांमधून ,सभेद्वारे विविध विषयावर समावेशक शिक्षणाचा प्रसार केला जातो.समावेशक शिक्षण यशस्वीपणे राबविण्यासाठी वरील प्रसार माध्यमांचा उपयोग करून घेता

समावेशक शिक्षणात विशेष शिक्षकाची भूमिका.


समावेशक शिक्षण प्रक्रीयेमध्ये जिल्हा पातळी आणि केंद्र पातळीवर विशेष शिक्षकाची नियुक्ती केली जाते.शाळेतील सर्व शिक्षकांच्या,मुख्याध्यापकांच्या मदतीने अपंग मुलांच्या विकासासाठी वैयक्तिक स्तरावर शैक्षणिक कार्यक्रम विशेष शिक्षक आखू असतात.अपंग मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन करू शकतात.समावेशक शिक्षण प्रक्रियेमध्ये सामान्य शिक्षकांबरोबर विशेष शिक्षकाचे महत्व अनन्यसाधारण आहे.शाळेमध्ये अपंग मुलांना प्रवेश देण्यासाठी त्यांची संख्या,अपंगाचा प्रकार जाणून घेऊनप्रवेश दिला जातो.व विशेष शिक्षकांची नियुक्ती केली जाते.आपल्या शालेय परीसरामध्ये एखादा अपंग विद्यार्थी किंवा विशेष गटातील विद्यार्थी आढळून आले तर त्याच्या पालकांशी संपर्क साधला जातो.अशा स्वरूपाच्या पाल्यांना शाळेत प्रवेश घेण्यासंदर्भात पालकांना प्रोत्साहन दिले जाते.पालकाची पाल्याच्या प्रवेशासंदर्भात सकारात्मक मन;स्थिती तयार केली जाते.शाळेमध्ये विशेष किंवा अपंग विद्यार्थ्यांच्या संदर्भात शिक्षणासाठी असणाऱ्या योजनाची माहिती पालकांना करून दिली जाते.प्रत्येक विशेष/अपंग बालकाच्या समतेनुसार सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.शालेय

गरजांनुसार आवश्यकता असल्यास अपंगत्व प्रकारानुसार बांधकामविषयक सुधारणा करून घ्यावी.उदा-आसन व्यवस्था ,येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग,

शारीरिक गरजांची पूर्तता करण्यासाठी व्यवस्था इत्यादी ,शाळेत समावेशक शिक्षण योजना राबविण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांची सभा बोलावून माहिती द्यावी,प्रत्यक्ष अध्यापन करताना येणाऱ्या संभाव्य अडचणी जाणून घाव्यात.त्या अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून काळजी घ्यावी.उपाययोजना तयार ठेवाव्यात. शाळेतील सर्व विद्यार्थींची वर्गावर सभा आयोजित करून सहकार्यतेचे सहजीवनाचे महत्व समजून द्यावे.तसेच आपल्या शाळेत येणाऱ्या अपंग विद्यार्थांना सामावून घेण्याविषयी व भावभावनाची जोपासना करण्यासाठी प्रेरणा द्यावी,विशेष विद्यार्थ्यांच्या संसाधन खोलीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी,अपंगत्वानुसार साधन सामग्री उपलब्ध करून द्यावी.साधनसामग्रीची देखभाल करावी.समावेशक शिक्षणासाठी अपंगत्वानुसार प्रत्येक विद्यार्थ्याची सोय व्हावी यासाठी शाळेकडे शासनाकडून वेळोवेळी विविध अनुदानांची व्यवस्था केली जाते.त्यामुळे साहजिकच अपंगाच्या जीवनात आनंद निर्माण करता येतो.त्या विद्यार्थ्याचा बौद्धक मानसिक,भावनिक व शैक्षणिक विकास साधण्यास मदत होईल.समावेशक शिक्षण यशस्वी करण्यासाठी जिल्हा पूनर्वसन केंद्र,जिल्हा साधन केंद्र ,बालक कल्याण कार्यकर्ते,स्थानिक सं स्था,हॉस्पिटल ब्रेल प्रेस, विशेष शाळा,अपंग एकात्म योजना,समाजकल्यान विभाग इ.विविध विभागांशी निगडीत मनुष्य साहित्याचे आदानप्रदान केल्यास यासाठी प्रेरणा मिळते.यश मिळते.समावेशक शिक्षणामध्ये अपंग बालकांचा

इतर सामान्य बालकांसोबत सुरळीत संबंध स्थापण्याचा प्रयत्न केला जातो.हे सर्वसामान्य मुले अशा मुलांचे मित्र,मदतनीस,मार्गदर्शक बनू शकतात सर्वसामान्य मुलांच्या मदतीने विशेष व अपंग मुलांना अध्यायनामध्ये सुकरता आणता येऊ शकते.असे प्रयत्न शाळेने व शिक्षकांनी करावेत.याकरिता सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्थेत सोय करण्यात आलेली आहे.या सर्व

दृष्ठीकोनातून विचार केला असता सर्वसमावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे.




| *पारंपारिक शिक्षण | *सर्वसमावेशक शिक्षण |
|---|---|
| १)अभ्यासक्रम ठराविक असतो. | १)अभ्यासक्रम लवचिक असतो. |

| | |
|---|---|
| २)अध्यापनाचे स्वरूप समूहानुसार असते. | २) अध्यापनाचे स्वरूप वैयक्तिक असते. |
| ३)अध्यापन परिणामकारक होण्यावर भर. | ३) अध्यापन परिणामकारक होण्यावर भर. |
| ४)विषय केंद्रितशिक्षण पद्धती. | ४)विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धती . |
| ५)भौतिक साधन सुविधा ठीक. | ५) भौतिक साधन सुविधा भरपूर व गरजेनुसार. |
| ६)विशेष प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध असतात. | ६)अल्प प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध |

❖ **<u>समावेशक शिक्षणातील अडचणी</u>**

